# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. २९/११/२०१८

## मौजे शिवणे ता. हवेली येथील कोतवालास पंधरा हजार रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या जागेची खरेदीखताप्रमाणे ७/१२ पत्रकी नोंद घेणेकरीता मौजे शिवणे ता. हवेली येथील लोकसेवक कोतवाल सुखदेव शिंदे यांनी तक्रारदार यांचेकडे पंधरा हजार रूपयांची लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक २९/११/२०१८ रोजी पडताळणी केली असता, तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या जागेची खरेदीखताप्रमाणे ७/१२ पत्रकी नोंद घेण्यासाठी कोतवाल सुखदेव शिंदे याने तक्रारदार यांचेकडे पंधरा हजार रूपयांची लाचेची मागणी केली.

त्यावरुन आज दिनांक २९/११/२०१८ रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक सुखदेव दत्तात्रय शिंदे, वय ५३, कोतवाल, मौजे शिवणे ता. हवेली जिल्हा पुणे याने तक्रारदार यांचेकडून १५,०००/- रूपयांची लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या अतुलनगर येथील राहते घराचेसमोर स्विकारल्यावर त्यास रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचेवर वारजे माळवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

( सुहास नाडगौडा )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.